**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. २**
**सभावृत्तांत**

दिनांक :- २५/४/२०१६ वेळ :- दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची विशेष सभा सोमवार दिनांक २५/४/२०१६ रोजी दु. १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर अध्यक्षा
२. मा.गणेश नारायण लोंढे
३. मा.शमीम पठाण
४. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव
५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
६. मा.को-हाळे अनंत सुभाष
७. मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख
८. मा.गावडे जयश्री वसंत
९. मा.विमलताई जगताप
१०. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
११. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१२. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१३. मा.गिरीष ज्ञानेश्वर शेडगे स्वीकत सदस्य
१४. मा.शरद माणिकचंद लुणावत स्वीकृत सदस्य
१५. मा.गोरक्ष दशरथ पाषाणकर स्वीकृत सदस्य

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.सुभाष माछरे – क्षेत्रिय अधिकारी ,मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा. देवण्णा गटटुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.एस.एस.मोरे – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग मा.एकनाथ पाटील – उपअभियंता विदयुत विभाग, मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.एन.आर. निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य, मा.राजेंद्र डुंबरे – उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.आबासाहेब ढवळे – उपअभियंता, बांधकाम परवानगी विभाग, मा.के.डी.दरवडे , सहा.आरोग्याधिकारी, मा.गणेश देशपांडे, मुख्य आरोग्य निरिक्षक इत्यादी.

सभेच्या सुरवातीस मा.शमीम पठाण यांनी पुढील प्रमाणे सुचना मांडली.

आज दिनांक २५/४/२०१६ रोजीच्या प्रभाग समिती सभेत कै.सुभाष सोपानराव भोईर,कै.कुसुम भिकोबा चिंचवडेपाटील, कै.आनंदीबाई दत्तात्रय कुंभार, कै.विलास बागडे, कै.नितीन भामरे, कै.महादेव गुणाजी डांगे, यांना श्रध्दाजंली वाहणेत यावी.

सदर सुचनेस मा.आश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांनी अनुमोदन दिले.
तदनंतर सर्व सन्मा.सदस्य, अधिकारी यांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दाजंली वाहणेत आली त्यानंतर मा. सभाध्यक्ष सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

ठराव क्र. ३ — विषय क्र. १
दि. २५/४/२०१६ — विभाग - आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.शमीम पठाण — अनुमोदक: मा. आश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.बक्षेआ/स्वभा/कावि/२३/२०१६, दिनांक २२/४/२०१६

देशातील सर्व शहरामधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दि.२/१०/२०१४ पासून केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपुर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र.स्वभाअ/२०१५ /प्र.क्र .२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दि. २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उददीष्ठ निश्चीत केलेले आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शौचालये उपलब्ध नसलेल्या नागरीकांना वैयक्तीक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तसेच काही ठिकाणी सार्वजनिक शौचालये उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत. उघडयावर शौचास जाणा-या नागरीकांचे प्रबोधन करुन त्यांना शौचालयांचा वापर करणेबाबत प्रवृत्त करण्यात येत आहे.

मा.आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.मातवी/१२/कावि /९६ /२०१६, दि.१/४/२०१६ अन्वये कळविलेनुसार दि.२/१०/२०१७ पुर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उददीष्ठ निश्चीत केलेले आहे. त्यानुषंगाने ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. २३ केशवनगर व प्रभाग क्र. २४ प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह हे दोन प्रभाग दि. ३० एप्रिल २०१६ पुर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ १९१ /२०१६.
दिनांक : २८ / ०४ /२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना